# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पोस्टे हदगांव, जि नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गुरनं ४००/२०२५ कलम कलम ७, ७ अ, १२ भ्रप्रअ १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरूष, वय 63 वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | 1) श्रीमती सुमन संभाजी कऱ्हाळे, वय 44 वर्षे, पद निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हदगाव, ता. हदगाव जि.नांदेड. (गट ब)<br>2) गोविंद आप्पाराव जाधव, व्यवसाय कंत्राटी संगणक डेटा एन्ट्री ऑपरेटर, नेमणूक तहसील कार्यालय हदगाव, ता. हदगाव जिल्हा नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक २२/११/२०२५ रोजी चे १३.०४ ते १५.५७ वाजताचे दरम्याण तहसिल कार्यालय हदगांव, जि नांदेड |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २३/११/२०२५ रोजी ०२.२३ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ५,७००/— रूपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ५,७००/— रूपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दि. २०/११/२०२५ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार यांचे स्वत:चे नावावर रेशन धान्य वितरण दुकान आहे. तक्रारदार यांना मागील ४ महिन्याचे जो धान्य पुरवठा झाला होता त्याचे कमिशन म्हणून ५७०००/— रुपये मिळाले होते. माहे नोव्हेंबर २०२५ चे रेशन प्राप्त झाले असून पुरवठा निरीक्षक यांनी ते इ पॉज या मशीनवर अपलोड केले नाही. ज्यामुळे पुढील रेशन वाटप करता येणार नव्हते. तसेच २७ नवीन लाभार्थी यांचे नाव ऑनलाईन करण्यासाठी दिनांक १८/११/२०२५ रोजी तक्रारदार यांनी पुरवठा निरीक्षक सुमन कऱ्हाळे यांची तहसील कार्यालय हदगाव येथे जाऊन भेट घेतली. तिथे त्यांनी त्यांचे कंत्राटी संगणक डेटा एन्ट्री ऑपरेटर गोविंद जाधव यांना बोलावून त्यांचे समक्ष तक्रारदार यांना माहे नोव्हेंबर २०२५ चे रेशन इ पॉज मशीनवर अपलोड करण्यासाठी व २७ नवीन लाभार्थ्यांचे नाव ऑनलाईन करण्यासाठी कमिशन पोटी शासनाकडून मिळालेले ५७ हजार रुपये चे २० टक्के रक्कम लाच म्हणून मागितली व गोविंद जाधव यांनी देखील तीच मागणी केली बाबत तक्रार दिली.<br>दिनांक २२/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कडून लाच मागणी कारवाई दरम्यान पुरवठा निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसीलदार सुमन कऱ्हाळे यांनी शासकीय पंचा समक्ष तडजोडीअंती कमिशनचे १०% प्रमाणे रुपये ५७००/— ची लाच मागणी करून कंत्राटी संगणक डेटा एन्ट्री ऑपरेटर गोविंद जाधव यांच्याकडे लाच देण्यास सांगितली.<br>दिनांक २२/११/२०२५ रोजी गोविंद जाधव यांनी तक्रारदार यांचे कडून स्वत:साठी व पुरवठा निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसीलदार सुमन कऱ्हाळे यांच्यासाठी लाच ५७००/— स्विकारली म्हणुन पोस्टे हदगाव, जि नांदेड येथे गुरनं ४००/२०२५ कलम कलम ७, ७ अ, १२ भ्रप्रअ १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेडचे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक श्रीमती प्रिती जाधव, श्रीमती अर्चना करपुडे यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| **१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** | – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९ |
| **२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** | – ०२४६२ – २५५८११ |
| **३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** | – मो.नं. ९३५९०५६८४०. |
| **४) टोल फ्रि** | – १०६४ |
| **५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक** | – ०२४६२ – २५३५१२ |
| **६) Website** | – **www.acbmaharashtra.gov.in** |
| **७) Mobile App** | – **www.acbmaharashtra.net** |
| **८) Facebook Page** | – **www.facebook.com/maharashtraACB** |
| **९) Twitter** | – **@ACBnanded** |
| **१०) Instagram** | – **acb_nanded** |
| **११) Youtube Cahnnel** | – @AntiCorruptionBureauNanded |

**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड**